# पुढारी

मुख्याधिकारी वडूज नगरपंचायत वडूज



## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

एम.ए.आय.डी.सी. इमारत ताराराणी चौक, कावळा नाका, कोल्हापूर - ४१६००१

दूरध्वनी क्र. ०२३१- २५२८८७७ | E-Mail - Kolhapur.ro@mswc.in


## गोदाम भाडेतत्वावर देणेबाबत

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे कोल्हापूर विभागाअंतर्गत असलेले गोदाम 'जसे आहे तसे' या पद्धतीने व्यापारी सहकारी संस्था, मिल कारखाने, खत कंपन्या, दूध डेअरी, कारखाने यांना खालील नमूद दराप्रमाणे किंवा त्यापेक्षा जास्त दराने गोदाम १ वर्ष किंवा जास्तीत जास्त कालावधीकरीता लॉक ॲण्ड की, भाडेतत्वावर देण्याचे आहे.

| वखार केंद्राचे नाव | गोदाम उपलब्ध जागा अंदाजे (चौ.फूट) | चौ.फूट चा महामंडळाच्या दरसुचीनुसार दर | संपर्कासाठीचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सातारा – जळगाव | १०,००० चौ.फूट | १७.४० (प्रति माह, प्रति चौ.फूट) | महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, भिवडी–जांब–जळगाव रोड, सातारा जळगाव, कोरेगाव, सातारा – ४१५०१० मोबा. +९१ ८८३०० ७८९१३ |

- गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- इच्छुकांनी अधिक माहितीसाठी वर नमूद पत्त्यावर संपर्क साधून दरपत्रके सादर करावीत.

विभागीय व्यवस्थापक,
मरावम कोल्हापूर


Satara Edition

Jun 06, 2026 Page No. 09

Powered by: erelego.com



Scanned with OKEN Scanner

**कोल्हापूर विभागा अंतर्गत येणाऱ्या वखार केंद्रावरील गोदाम भाड्याने (लॉक ॲण्ड की तत्वावर) देणेबाबत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या अटी व शर्ती**

- वखार केंद्रावरील गोदाम सुविधा 'जसे आहे तसे ' पद्धतीने लॉक ॲण्ड की तत्वावर १ वर्ष किंवा जास्तीत जास्त कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्यातचे नियोजन आहे.
- गोदाम जसे आहे त्या स्थितीत ताब्यात देण्यात येईल. तथापि भाडे तत्वावरील कालावधी समाप्तीनंतर काही नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास सुरक्षा ठेव रकमेतून सदरच्या दुरुस्तीचा खर्च वसूल करण्यात येईल.
- १२ महिने आरक्षणासाठी लॉक-इन कालावधी –३ महिने इतका राहील.
- गोदाम इमारतीचा विमा महामंडळाकडून केला जाईल.
- गोदामाची किल्ली व कुलूप ठेवदाराकडे असेल. पण आपत्कालीन परिस्तिथीत एक किल्ली साठा अधिक्षक यांच्याकडे द्यावी लागेल.
- गोदामातील साठ्याच्या देखभालीसाठी एकूण मनुष्यबळाचा खर्च व इतर खर्च ठेवदाराकडून केला जाईल.
- आरक्षण कालावधी पूर्ण झाल्यावर महामंडळ आणि ठेविदार यांच्यात परस्पर संमतीने करार नव्याने नुतनीकरण केला जाऊ शकतो.
- यशस्वी दरपत्रकाला आरक्षण मंजुरी पत्र देण्यात आल्यानंतर त्यांनी त्वरित संमतीपत्र देऊन व 3 महिने च्या भाडे एवढी रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रक्कमेचा भरणा करुन गोदामाचा ताबा घेण्यात यावा. आणि ताबा पावती संबंधित केंद्र प्रमुखांकडे द्यावी.
- ठेवीदाराला लॉक ॲण्ड की भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामाचा १५ दिवसांत नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे. सदर करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक इ. बाबींचा सर्व खर्च ठेविदार यांनी करावा. ठेविदार यांना सदरचे आरक्षण वर नमूद अटी व शर्तींच्या आधीन राहून मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र महामंडळास त्वरीत सादर करावे लागेल.
- करारनाम्यात नमूद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत गोदाम भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे ठेविदार यांना बंधनकारक राहील. ठेविदाराकडून पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत गोदाम भाडे जमा न झाल्यास, उशिराने जमा करण्यात येणाऱ्या रकमेवर प्रती महा २% दराने व्याज आकारण्यात येईल.
- ठेविदार यांनी साठवलेल्या मालाचा विमा उतरावा व सदर विम्याची प्रत संबंधित केंद्र प्रमुख, यांच्याकडे १५ दिवसात सादर करावी.
- Lock in period समाप्त झाल्यानंतर करारनामा रद्द करावयाचा असल्यास ठेविदार कडून ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास गोदामाची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडून कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल. त्याप्रमाणे कंपनीने सदर गोदामाचा ताबा विना अट महामंडळाकडे परत सुपूर्द करण्यात येईल. याबाबत शपथपत्र द्यावे.
- सदर आरक्षित जागेतील साठवणूकी मुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ठेविदार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही .

Scanned with OKEN Scanne
Scanned with OKEN Scanner

- सदर आरक्षित जागेत साठवणूकीमुळे महामंडळाच्या वखार केंद्रावर निर्माण होणा ऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील . तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची ठेविदार यांनी काळजी घेऊन आवश्यक तो उपाययोजना करावी.
- ठेविदार यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, इत्यादी ठेवीदाराने स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत.
- महामंडळाच्या वखार केंद्रांच्या प्राथमिक बाह्य सुरक्षिततेची जबाबदारी महामंडळाची राहील. तसेच गोदामाच्या अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी ठेविदार यांची राहील. आवश्यकतेनुसार ठेवीदाराने सुरक्षितेच्या दृष्टिने स्व:खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घ्यावा.
- विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने /परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाकडून देण्यात येतील एकुण भाडे देयकावर १०% टीडीएस करुन प्रमाणपत्र संबंधित केंद्रप्रमुख, वखार केंद्र यांचेकडे सादर करावे.
- ठेवीदाराचे थकीत गोदाम भाडे रक्कम हि त्याच्या महामंडळाकडे जमा असलेल्या सुरक्षा ठेव रकमेपेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास आल्यास साठा अधिक्षक /विभाग प्रमुख, यांच्याकडून ठेवीदारास तात्काळ गोदाम खाली/रिकामे करण्याबाबत नोटीस देण्यात येईल.
- प्रस्ताव धारकाने जाहिरातीत नमूद केलेली सुविधेची प्रत्यक्ष साईट वर भेट देऊन पाहणी/खात्री करावी त्यानंतरच दरपत्रके सादर करण्यात यावी.

-सही

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

Scanned with OKEN Scanne

Scanned with OKEN Scanner